प्रकरणातील सर्व कागदपत्राचे अवलोकन केले असता मौजा वडगांव रोड ता.यवतमाळ स.नं. १२/२ अ क्षेत्र १.२१ हे.आर जमिन निवासोपयोगी कामाकरीता अकृषीक परवानगी अपर जिल्हाधिकारी यवतमाळ यांचे फाईलवरील रा.मा.क्र.४२/एनएपी-३४/२००२-०३ मौजा वडगांव रोड यामधिल आदेश दिनांक १९ मार्च २००३ अन्वये आवेदक श्री.नंदकिशोर मधुकरराव गुप्ते व ईतर ४ यांना देण्यात आलेली आहे. सदर ले-आऊट मधिल भूखंड क्र.१ ते ४ व १७ ते ३६ एकूण क्षेत्रफळ ४२८७.५० चौ.मि. जागा आवेदकाने दि.२.४.२००९ चे विक्रीपत्रानुसार खरेदी केली असून आज त्यांचे नावाने सदर जागेची नोंद गांव नमुना ७ वर झालेली आहे. ७/१२ नुसार सदर भूखंड क्र.१ ते ४ व १७ ते ३६ मधिल एकूण क्षेत्रफळ ४२८७.५० चौ.मि. जागा विदर्भ प्रिमीअर को-ऑप.हाऊसिंग सोसायटी लि.नागपूर तर्फे अध्यक्ष श्री.रविंद्र देविदास दुरगकर रा.नागपूर यांच्या नावाने आहे.

सहाय्यक संचालक नगर रचना यवतमाळ यांनी सदर भूखंडास विभाजनाची परवानगीची शिफारस केली असल्यामुळे महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४४ व महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन परिपत्रक क्र.एनएपी-१०८८/प्र.क्र.१२७५/ल-२ दिनांक १२.१०.८८ नुसार मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये महाराष्ट्र जमिन महसूल संहिता १९६६ मधिल कलम १३० नुसार मी एस.एस.फडके, अपर जिल्हाधिकारी यवतमाळ आवेदक विदर्भ प्रिमीअर को-ऑप.हाऊसिंग सोसायटी लि.नागपूर तर्फे अध्यक्ष श्री.रविंद्र देविदास दुरगकर रा.नागपूर यांना मौजा वडगांव रोड ता.यवतमाळ येथील स.नं.१२/२ अ मधिल भूखंड क्र.१ ते ४ व १७ ते ३६ एकूण क्षेत्रफळ ४२८७.५० चौ.मि. जागेचे भुखंड विभाजनाची परवानगी निवासोपयोगी प्रयोजनाकरीता खालील अटी व शर्तीवर मंजूर करण्यात येत आहे.

१) सहाय्यक संचालक नगर रचना यवतमाळ यांनी घालुन दिलेल्या अटींचे पालन करणे आवेदकास बंधनकारक राहील. व सदर भूखंडाचे विभाजन नंतर भविष्यात पुन्हा विभाजन करण्यात येणार नाही.

२) ग्रामपंचायत वडगांवरोड ता.यवतमाळ यांनी घालुन दिलेल्या अटींचे पालन करणे आवेदकास बंधनकारक राहील.

३) विभाजीत भूखंडावर खालील प्रमाणे सुधारीत अकृषीक आकारणी करण्यात येत आहे.

| अ.क्र | भूखंड क्रमांक | एकुण भूखंड | निवासोपयोगी वापराखालील प्रत्येक भूखंडाचे क्षेत्र चौ.मिटर | भूखंडाचे एकूण क्षेत्र चौ.मिटर | वार्षिक अकृषीक आकारणी १० पैसे प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1 | १ | २५०.६५ | २५०.६५ | २५.०६ |
| 2 | 2 A | १ | १३८.१५ | १३८.१५ | १३.८१ |
| 3 | 2 B ते 3 B | ३ | १४२.५ | ४२७.५ | ४२.७५ |
| 4 | 4 A ते 6 B | ६ | १०४ | ६२४ | ६२.४ |
| 5 | 7 | १ | १७२.२५ | १७२.२५ | १७.२३ |
| 6 | 8 A | १ | १०४.१५ | १०४.१५ | १०.४२ |
| 7 | 8 B | १ | १०८.५ | १०८.५ | १०.८५ |
| 8 | 9 A | १ | ११९ | ११९ | ११.९ |
| 9 | 9 B | १ | १०५ | १०५ | १०.५ |
| 10 | 10 A ते 14 A | ९ | ११९ | १,०७१ | १०७.१ |
| 11 | 14 B | १ | ११४.६५ | ११४.६५ | ११.४७ |
| 12 | 15 A | १ | १०७.६५ | १०७.६५ | १०.७६ |
| 13 | 15 B ते 19 B | ९ | १०५ | ९४५ | ९४.५ |
| | एकूण | | | ४,२८७.५ | ४२८.७५ |

वार्षिक अकृषीक आकारणी रुपये ४२९/- (अक्षरी रुपये चारशे एकोनत्तीस फक्त ) ही अकृषीक आकारणी दि.१.८.०८ ते ३१.८.२०११ या कालावधीसाठी आकारण्यात आलेली आहे. यानंतर दर पाच वर्षांनी पुर्नविलोकन करण्यात येईल व त्यानंतर शासनाने निश्चीत केलेल्या दरानुसार सुधारीत अकृषीक आकारणी फरकाची रक्कम भरणा करणे बंधनकारक राहील.

वार्षिक अकृषीक आकारणीची रक्कम व ही आदेशाच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आंत भरणा करणे बंधनकारक राहील.

इतर अटी व शर्ती अपर जिल्हाधिकारी यवतमाळ यांचे फाईलवरील रा.मा.क्र.४२/एनएपी-३४/२००२-०३ मौजा वडगांव रोड यामधिल दिनांक १९ मार्च २००३ च्या आदेशामधिल कायम राहील.